४.८४
०८-९-२०२३
आ. क्र. ४७०

# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२७२०११६, विस्तार क्र.२२५ proumc321@gmail.com

दिनांक : ०८/०९/२०२३

## प्रेसनोट

केंद्र शासनाच्या वने, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागामार्फत राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रम अंतर्गत दिनांक ७ सप्टेंबर, २०२३ हा दिवस निळया आकाशासाठी आंतरराष्ट्रीय शुध्द हवा दिवस (International Day Of Clean Air For Blue Skies ) साजरा करताना शहरातील नागरीकांमध्ये हवेची गुणवत्ता चांगली राखण्यासाठी व्यापक स्वरूपात जनजागृती करण्यात यावी असे निर्देश होते.

मा. आयुक्त, अजीज शेख, उपायुक्त, डॉ. सुभाष जाधव, यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरण विभागप्रमुख सौ. विशाखा सावंत, यांचेमार्फत उल्हासनगर महानगरपालिका व श्रीम. चांदीबाई हिम्मतमल मनसुखानी महाविद्यालय, उल्हासनगर यांच्या समन्वयाने दिनांक ०८/०९/२०२३ रोजी सेमिनार व Quiz Competition चे आयोजन करण्यात आले. सदर सेमिनारमध्ये मा. अविनाश शिरोळे, माजी इस्त्रो इंजिनिअर तसेच श्री. आयुफ अकोला, संचालक, इन्फिनीटी पब्लिक रिलेशन्स, यांनी विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती होणेकरीता हवेचे प्रदुषण म्हणजे काय , ते कोणत्या कारणांनी होते तसेच हवेचे प्रदुषण कमी करण्यासाठी आपण व्यक्तीशः किंवा सामुदायिकरित्या काय उपाययोजना करू शकतो याबाबत मार्गदर्शन केले.

सदर सेमिनारच्या शेवटी विद्यार्थ्यांसाठी Quiz Competition घेतली त्यामध्ये सर्वात आधी सदर Quiz पुर्ण करणा-या १० विद्यार्थ्यांना मा. आयुक्त यांच्याहस्ते प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले.

सदर सेमिनारकरीता सी.एच.एम. महाविद्यालयाच्या प्राचार्य, इतर प्राध्यापक तसेच श्री. प्रशांत पाटील हेदेखील उपस्थित होते.

8/9/23

(छाया प्रकाश डागळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.
१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.